# पुरोगामी महाराष्ट्रात शाळाबंदचा निर्णय दुर्दैवी : सौ. धनश्री लाड

**कुंडल :** पुरोगामी महाराष्ट्रात सर्वसामान्यांसाठी असणाऱ्या जि. प. शाळा बंद करण्याचा निर्णय दुर्दैवी असून, हजारो मुलींच्या शिक्षणाचा मार्गच बंद करुन या सरकारला काय सिद्ध करायचे आहे ? असा प्रश्न सौ. धनश्री लाड यांनी केला.

त्या कुंडल (ता. पलूस) येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी सरपंच सौ. प्रमिला पुजारी, प्राचार्य डॉ.के.एम नलावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सौ. लाड म्हणाल्या, सरकारच्या शाळा बंदच्या निर्णयाने अगोदरच पुरुषप्रधान संस्कृतीमुळे मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या समाजात पुन्हा मुली अशिक्षित राहून विषमता वाढणार असून, याच्या विरोधात सर्व स्त्रीयांनीच संघटीत होऊन आवाज उठवणे आवश्यक आहे.

प्रांरभी प्राचार्य डॉ.के.एम. नलवडे यांनी प्रास्ताविक केले. कोमल भिसे, स्नेहल थोरबोले, काजल दौंडे, ऐश्वर्या डुबल, प्रतिक्षा गडचे, श्रद्धा एडके यांनी मनोगत, कविता व्यक्त केल्या.

यावेळी श्रीमती कमलेश सोळवंडे, सौ. दिपाली पवार, राजश्री पवार, हेमा पाकले, उज्ज्वला जाधव, राजश्री लाड, शशिकला कौळी आदी उपस्थित होते.

दै. तरुण भारत ता १२/०३/२०१८